सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शैक्षणिक दिनदर्शिका


## (इयत्ता पहिली)

## ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, २०२१




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

# प्रेरणा व मार्गदर्शन



**मा.ना.उद्धवजी ठाकरे**
**मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य**



**मा.ना.अजित पवार**
**उपमुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य**



**प्रा.वर्षा गायकवाड**
**मंत्री**
**शालेय शिक्षण विभाग**
**महाराष्ट्र राज्य**



**मा.ना. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू**
**राज्यमंत्री,**
**शालेय शिक्षण,**
**महाराष्ट्र राज्य**



**मा.वंदना कृष्णा(भा.प्र.से.)**
**अपर मुख्य सचिव**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**महाराष्ट्र राज्य**



**मा.राहुल द्विवेदी(भा.प्र.से.)**
**राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र**
**प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई**



**मा.विशाल सोळंकी(भा.प्र.से.)**
**आयुक्त (शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य**



# शुभेच्छा संदेश

कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या जागतिक महामारीने आपण मागील वर्षभरापसून अद्याप शाळा प्रत्यक्षपणे पूर्ण क्षमतेने सुरु करु शकलो नाही. विद्यार्थ्यांना शिक्षणाशी जोडण्याकरीता आपण अनेक प्रयत्न करीत आहोत. शाळा बंद असल्या तरी शिक्षण सुरु राहण्यासाठी आपण अनेक पर्यायांचा नवतंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेतला त्यामुळे महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील वाडी-वस्त्यांवरील मुलांना सेतू अभ्यासक्रमाच्या माध्यमातून आणि सर्वांच्या प्रयत्नाने आपण शिकते ठेवू शकलो याचा मला आनंद वाटतो.

मुलांचे आरोग्य व सुरक्षितता यांना प्राधान्य देवून मुलांना शिकते करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र ,पुणे गतवर्षीप्रमाणे यावर्षीही 'शैक्षणिक दिनदर्शिका' घेऊन येत आहे. या शैक्षणिक दिनदर्शिकेस आपण सर्व शिक्षक, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी सकारात्मक प्रतिसाद दयावा असे आवाहन मी या निमित्ताने करते.

सर्वांना चालू शैक्षणिक वर्षाच्या मनस्वी शुभेच्छा!

**प्रा.वर्षा गायकवाड**
**मंत्री**
**शालेय शिक्षण विभाग**
**महाराष्ट्र राज्य**



# मनोगत

महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थी,पालक आणि शिक्षकांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

मागील संपूर्ण वर्ष आपण कोविड-१९ च्या संकटाला तोंड देत आहोत. त्याची संसर्गजन्यता लक्षात घेता गेली अठरा महिने आपण प्रत्यक्ष शाळाच सुरु करू शकलो नाही. पण शाळा जरी बंद ठेवाव्या लागल्या तरी अशा आपत्कालीन परीस्थितीमुळे मुलांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी मागील वर्षभरापासून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत दूरदर्शन, रेडीओ, स्मार्ट फोन, गुगल क्लास रुम यांच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम सुरु केले.ज्यामुळे विद्यार्थी घरी राहूनही शिक्षण घेत राहिली. या संदर्भात शिक्षकांचे कार्य सुद्धा अतिशय कौतुकास्पद आहे. दूर दुर्गम, वाड्या, वस्त्या, तांडे तसेच शहरी भाग सर्वत्र घरी राहून ही मुले शिकती रहावी म्हणून शिक्षकांनी ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने जमेल त्या मार्गाने शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न निरंतर करीत आहेत.

तथापि या सर्व प्रयत्नात सर्वच विद्यार्थ्यांना त्या त्या इयत्तांच्या सर्वच विषयांच्या क्षमता संपादित होण्यामध्ये अडचणी निर्माण झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अडचणी सोबत घेवून ते पुढील शैक्षणिक वर्षामध्ये प्रविष्ट झाले असतील तर पुढील इयत्तांच्या क्षमता प्राप्त करण्यामध्ये सुद्धा त्यांना अडचणी निर्माण होऊ शकतात. हे गृहीत धरून आपण ४५ दिवसाचा सेतू अभ्यासक्रम सुद्धा सुरु केला. १४ ऑगस्ट रोजी हा अभ्यासक्रम संपल्यानंतर मागील वर्षीप्रमाणे या वर्षीही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक दिनदर्शिकेची निर्मिती केली आहे.या दिनदर्शिकेचा उपयोग करून विद्यार्थी आपल्या सवडीनुसार,वेळेनुसार अभ्यास करू शकणार आहेत. यामध्ये अध्ययन पूरक विविध कृती, सरावासाठी प्रश्न यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. शाळा बंद असल्या तरी विद्यार्थी घरी बसून या शैक्षणिक दिनदर्शिकेचा उपयोग करून सहजपणे आपला अभ्यास करू शकणार आहेत.

मागच्या वर्षी शैक्षणिक दिनदर्शिकेचा विद्यार्थी,शिक्षक,पालक यांनी प्रभावी वापर केला आहे . त्याचा उत्तम परिणाम दिसून आला आहे . यावर्षी सुद्धा या उपक्रमास शिक्षक,पालक, व विद्यार्थी सकारात्मक प्रतिसाद देतील व शिक्षणाची प्रक्रिया सुरु ठेवतील अशी मला आशा आहे.

**एम. डी. सिंह (भा.प्र.से.)**
**संचालक**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण**
**परिषद, महाराष्ट्र, पुणे**

# शैक्षणिक दिनदर्शिका

नमस्कार विद्यार्थी मित्रहो,

सध्या कोविड-१९ या रोगामुळे संपूर्ण जग विविध समस्यांना सामोरे जात आहे. त्याला शिक्षणक्षेत्रही अपवाद नाही. जगभरातील शाळा-महाविद्यालये अनिश्चित काळासाठी बंद आहेत. शिक्षक, विद्यार्थी, पालक हे सर्वजण शाळा कधी सुरु होणार या विचारात आहेत. शाळा सुरु करता येत नसल्या तरी शिकणे जास्तीत जास्त समृद्ध करता येऊ शकेल का याचा विचार करून मागील शैक्षणिक वर्षाप्रमाणे या शैक्षणिक वर्षामध्ये देखील शैक्षणिक दिनदर्शिका उपलब्ध करून देण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी दीक्षा ऍप, रेडिओ, टेलिव्हिजन,यु ट्यूब ऑनलाईन तासिका, अध्ययन व्यवस्थापन प्रणाली (LMS) यांचा वापर देखील विद्यार्थी शिक्षणासाठी केला गेला. याचाच एक भाग म्हणून दीक्षा ऍप्लिकेशनचा वापर मुलांच्या अध्ययनासाठी करण्याचा एक छोटासा प्रयत्न शैक्षणिक दिनदर्शिकेच्या स्वरुपात मागील शैक्षणिक वर्षापासून आम्ही करत आहोत. सदर शैक्षणिक दिनदर्शिका स्मार्ट पीडीएफ रुपात असून यामध्ये दिलेल्या अध्ययन स्त्रोतांवर स्पर्श केल्यास संबंधित ई-साहित्य आपल्यासमोर व्हिडिओ स्वरुपामध्ये दिसेल. शैक्षणिक दिनदर्शिका पाहताना इंटरनेट कनेक्टिव्हिटीची समस्या जाणवत असल्यास रेंज आहे अशा ठिकाणी जाऊन संबंधित ई-साहित्य दीक्षा ऍप्लीकेशनवरून आपण डाऊनलोड करु शकता व इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसलेल्या ठिकाणी ऑफलाईन पद्धतीने अभ्यासू शकता.

महाराष्ट्र राज्यातील सर्वच विद्यार्थी व पालक सहजपणे वापर करु शकतील असा या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रातील ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर २०२१ या महिन्यांसाठीचा अध्ययन साहित्यस्त्रोतांचा संच शैक्षणिक दिनदर्शिकेच्या रुपामध्ये आपणा सर्वांसाठी उपलब्ध करून देत आहोत. तसेच शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस शैक्षणिक पूर्वतयारी व सेतू अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यास अध्यायन स्त्रोत उपलब्ध करून देण्यात आलेला होता. प्राप्त परिस्थितीत उपलब्ध अध्ययन स्रोतांच्या मदतीने तयार केलेल्या शैक्षणिक दिनदर्शिकेस शिक्षक, पालक व विद्यार्थी सकारात्मक प्रतिसाद देतील असा विश्वास वाटतो. शैक्षणिक दिनदर्शिकेचा उपयोग आपल्या पाल्याचे किंवा आपल्या विद्यार्थ्यांचे अध्ययन सुकर करण्यासाठी नक्कीच होईल अशी आशा आहे.

शैक्षणिक दिनदर्शिका विद्यार्थ्यांनी पालक आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वापरावयाची आहे. तसेच शिक्षकांनी फोन कॉल, व्हाट्सअप या माध्यमातून विद्यार्थी आणि पालक यांच्या संपर्कात राहून शैक्षणिक दिनदर्शिकेच्या साह्याने मुलांचे शिक्षण आनंददायी कसे होईल यासाठी प्रयत्न करावयाचा आहे. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक दिनदर्शिकेचा वापर करत असताना पालक आणि घरातील इतर वडीलधारी मंडळी तसेच मोठे बहीण-भाऊ यांच्या देखरेखीखाली अध्ययन साहित्य वापरावे. शैक्षणिक दिनदर्शिकेमध्ये अध्ययनस्त्रोत म्हणून दीक्षा ॲप वरील संबंधित घटकांचे ई-साहित्य दिले आहे. या साहित्याचा वापर संदर्भ म्हणून करण्यापूर्वी शिक्षकांशी चर्चा करणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे शिक्षकांच्या सूचनेनुसार पाठ्यपुस्तकांचाही वापर आवश्यक आहे.सदर दिनदर्शिका शिक्षकांनी आपल्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी.त्यांचे whatsapp ग्रुप करून किंवा प्रत्यक्ष गृहभेटीद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे आणि दिनदर्शिकेतील विद्यार्थी कृती समजावून सांगाव्या.

केवळ शैक्षणिक दिनदर्शिका पुरवल्याने विद्यार्थ्यांचा अभ्यास पूर्ण होणार नसून शिक्षकांनी सतत पालक व विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहणे त्यांच्याशी चर्चा करणे, त्यांना काही प्रश्न विचारणे या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करावे. विद्यार्थ्यांवर सतत ऑनलाईन चाचण्यांचा मारा करणे योग्य नाही. त्याचप्रमाणे लेखी गृहपाठ, स्वाध्याय आणि चाचण्यायामुळे विद्यार्थ्यांचे अध्ययन कंटाळवाणे होणार नाही याचीही दक्षता शिक्षकांनी घेणे आवश्यक आहे. याचबरोबर शासनामार्फत शिक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध माध्यमांचा देखील वापर करता येईल. त्याच प्रमाणे विद्यार्थीनिहाय या नियोजनामध्ये लवचिकता सुद्धा असावी.

# शिक्षकांसाठी सूचना :

1. शैक्षणिक दिनदर्शिका सर्व शिक्षकांनी आपल्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावी.
2. शैक्षणिक दिनदर्शिका विद्यार्थ्यांनी वापरायला सुरु करण्यापूर्वी शिक्षकांनी सर्व वापरकर्त्या विद्यार्थ्यांशी व पालकांशी फोन, व्हिडीओ कॉल, ग्रुप कॉल,कॉन्फरन्स कॉल करुन संवाद साधावा आणि शैक्षणिक दिनदर्शिका वापरुन अभ्यास कसा करावा याबद्दल मार्गदर्शन करावे.
3. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांचे मार्फत यापूर्वीच एकूण ४५ दिवसांचा सेतू अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. सदरचा अभ्यासक्रम राज्यातील विद्यार्थ्यांसाठी दिनांक १ जुलै २०२१ ते १४ ऑगस्ट, २०२१ या कालावधीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेला होता.त्याचा विद्यार्थ्यांच्या क्षमता प्राप्तीमध्ये उपयोग करावा.
4. वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना फक्त अभ्यासाबद्दल बोलू नये. हा संवाद अनौपचारिक असावा. विद्यार्थी, कुटुंब, सध्याची दिनचर्या व घरात सध्या स्वीकारलेली जबाबदारी, आजूबाजूच्या परिस्थितीबाबत त्याचे मत याबद्दल चर्चा करुन शिक्षक - विद्यार्थी संबंध दृढ होतील याची काळजी घ्यावी.
5. वर्गशिक्षकांनी, विषयशिक्षकांनी पाठ शिकताना पुस्तकाचा कसा वापर कसा करावा याबद्द्ल सूचना द्याव्यात.
6. प्रत्येक पाठाचे ई-साहित्य बघण्यापूर्वी व बघितल्यानंतर काय करावे याबद्दलही विद्यार्थ्यांना सांगावे.
7. त्याचप्रमाणे पाठातील ई-साहित्याशी संबंधित समांतर उपक्रम आणि स्वाध्याय ह्याबाबतीत विद्यार्थ्यांशी संवाद साधावा.
8. नियमित अभ्यासाला पर्याय म्हणून आपण दीक्षा ऍपचा वापर आपण करत नाही तर शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रियेतून जे विद्यार्थ्यांचे अध्ययन घडते त्याला पूरक साहित्य किंवा शैक्षणिक साहित्य म्हणून ई - साहित्याचा वापर करणे अपेक्षित आहे.
9. शैक्षणिक दिनदर्शिकेमध्ये देण्यात आलेल्या कृतीशिवाय शिक्षकांनी आपल्या स्तरावर इतर आवश्यक कृती व उपक्रम विद्यार्थ्यांना पुरविण्यास हरकत नाही.
10. सदर दिनदर्शिका इयत्तानिहाय व विषयनिहाय स्वतंत्र pdf स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यास सोपे होणार आहे.
11. शिक्षकांनी शैक्षणिक दिनदर्शिकेमध्ये दिलेल्या सर्व चाचण्या / स्वाध्याय विद्यार्थ्यांनी सोडविण्याविषयी सुचना द्याव्यात.

### शैक्षणिक दिनदर्शिका वापरण्यासाठी विद्यार्थी व पालक यांच्याकरिता महत्वाच्या सूचना :

1. शैक्षणिक दिनदर्शिका म्हणजे पाठ्यपुस्तकातील पाठांवर आधारित नियोजन असून त्याचा उद्देश विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ करणे हा आहे.
2. शैक्षणिक दिनदर्शिकेनुसार अध्ययन करताना यावर्षी आपल्याला पुरवलेल्या नवीन पाठ्यपुस्तकांचा उपयोग करावा.
3. दीक्षाऍप पाहण्यापूर्वी एकदा पाठ्यपुस्तकातून संबंधित पाठ वाचावा. त्याचप्रमाणे ई-साहित्य पाहिल्यानंतरही ई-साहित्यातील अध्ययन घटक पुन्हा वाचणे अधिक फायदेशीर ठरेल.
4. पाहिलेल्या आणि वाचलेल्या अध्ययन घटकांत काही समस्या असल्यास ती आपले पालक, घरातील ज्येष्ठ व्यक्ती, मोठे बहीण-भाऊ शिक्षक यांच्याशी चर्चा करावी.
5. एक पाठ अभ्यासून संपल्यानंतर त्यावरील स्वाध्याय पूर्ण करावा व शक्य झाल्यास तो घरातील ज्येष्ठांकडून तपासून घ्यावा.
6. दररोज प्रत्येक विषयाचा अभ्यास करण्याची सवय लावून घ्या.

7. ठराविक कालावधीनंतर शिक्षकांनी पाठवलेल्या चाचण्याही सोडवा.
8. ई-साहित्य वापरताना घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या सानिध्यातच रहा.
9. ई-साहित्य सलगपणे न पाहता प्रत्येक विषय संपल्यानंतर थोडी विश्रांती घ्या. मोबाईल किंवा इलेक्ट्रॉनिक गॅजेट काही वेळासाठी दूर ठेवा.
10. इ.१ ली व २ रीच्या विद्यार्थ्यांनी दीक्षा ॲप व पाठ्यपुस्तक घरातील वडीलधाऱ्या मंडळींच्याच मदतीने वापरायचे आहे.
11. आवश्यक तेथे सांगितलेल्या कृती, प्रयोग किंवा उपक्रम करण्यापूर्वी वडीलधाऱ्या मंडळींना त्याची कल्पना द्या अथवा त्या कृती किंवा उपक्रम त्यांच्या मदतीनेच करा.
12. दिनांक 23 /०७/२०२१ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२१ साठी कोव्हीड-१९ या कोरोना विषाणूच्या प्रदुर्भावाच्या पार्शभूमीवर इयत १ ली ते १२ वी चा पाठ्यक्रम २५% कमी करण्यात आलेला आहे. तरीही विद्यार्थ्यांनी सदर शासन निर्णयानुसार कमी केलेला पाठ्यक्रमाचे अवलोकन करावे. या पाठ्यक्रमाचे स्वयंअध्ययन करण्यासाठी पाठ्यपुस्तकातील सर्व घटकांचा समावेश दिनदर्शिकेत करण्यात आलेला आहे.
13. शैक्षणिक दिनदर्शिकेमधील लिंक open होत नसल्यास सदर घटकाशी संबंधित ई-साहित्य DIKSHA APP च्या माध्यमातून आपणास पाहता येईल. यासाठी DIKSHA APP आपल्या मोबाईल मध्ये DOWNLOAD करून घ्यावे. तसेच पाठ्यपुस्तकामध्ये देण्यात आलेल्या QR CODE DIKSHA APP मधून SCAN करून ही पाहता येईल.
14. प्रत्येक विषयातील प्रत्येक घटका नंतर त्या घटकावर आधारित चाचणी / स्वाध्याय देण्यात आली आहे. सदर चाचणी / स्वाध्याय विद्यार्थ्यांनी स्वतः सोडवावी. शिक्षकांनी या सर्व चाचण्या सोडविण्याविषयी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

# शैक्षणिक दिनदर्शिका

## माहे – ऑगस्ट,सप्टेंबर,ऑक्टोबर, २०२१

**DIKSHA APP DOWNLOAD करण्यासाठी** येथे क्लिक करा

## माहे : ऑगस्ट २०२१ विषय : मराठी

| अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | कालावधी | अध्ययन अध्यापन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| 01.01.02<br>01.01.03 | माझे पान<br><br>( वर्गपूर्व तयारी ) | पहिला व दुसरा आठवडा | | १.विद्यार्थी बडबड गीत ऐकतील.<br>2.विद्यार्थी टीव्ही / मोबाईल वरील बडबडगीतावर कृती करतील.<br>3.विद्यार्थी गोष्ट ऐकतील.<br>4.विद्यार्थी आजीने, आजोबांनी सांगितलेली गोष्ट ऐकून त्यावर कृती करतील.<br>5.विद्यार्थी परिचित / अपरिचित गाणी / बडबड गीत म्हणतील. |
| | | | | |
| 01.01.10 | १. अग्गोबाई ढग्गोबाई | तिसरा आठवडा | येथे क्लिक करा. | 1.विद्यार्थी कविता ऐकतील.<br>2.विद्यार्थी ऐकलेली कविता म्हणण्याचा प्रयत्न करतील.<br>3.विद्यार्थी ऐकलेल्या कवितेवर कृती करतील.<br>4.विद्यार्थी कविता लक्षपूर्वक श्रवण करतील.<br>5.विद्यार्थी पावसात आनंदाने कवितेचा आनद घेतील. |
| | | | | |
| 01.01.10 | 2.बीज | चौथा आठवडा | येथे क्लिक करा. | 1.विद्यार्थी अपरिचित चित्रावरून गोष्ट सांगतील.<br>2.विद्यार्थी अपरिचित चित्रांचे निरीक्षण करतील.<br>3.विद्यार्थी टी.व्ही ,मोबाईलच्या साह्याने ध्वनी लक्षपूर्वक ऐकतील.<br>4.विद्यार्थी परिचित / अपरिचित चित्रांच्या मदतीने घरातील मंडळींना गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करतील.<br>5.विद्यार्थी घरातील वस्तू ,साहित्य यांचे त्यांना आकलन झाल्यानुसार नावे सांगतील |
| 01.01.11 | 3.माझे खेळ | चौथा आठवडा | येथे क्लिक करा. | 1.विद्यार्थी चित्रांचे निरीक्षण करतील.<br>2.विद्यार्थी चित्रातील खेळ घरी खेळण्याचा प्रयत्न करतील.<br>3.विद्यार्थी खेळताना ध्वनी ऐकतील.<br>4.विद्यार्थी प्राण्यांचे आवाज काढण्याचा प्रयत्न करतील.<br>5.विद्यार्थी पक्ष्यांच्या आवाजाचा खेळ खेळतील आणि आवाजावरून पक्ष्याचे नाव ओळखण्याचा प्रयत्न करतील.<br>6.विद्यार्थी आपल्या घरातील भांडी ,वस्तू यांच्या नावांचे उच्चारण करून त्यामधील ध्वनी आणि अक्षरे ओळखण्याचा प्रयत्न करतील.<br>७.विद्यार्थी माहित असणाऱ्या शब्दांचे उच्चारण करतील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 01.01.14 | 4.माझे मित्र<br><br>5.माझे कुटुंब | पाचवा आठवडा | येथे क्लिक करा. | 1.विद्यार्थी आपल्या कुटुंबातील आई, बाबा, दादा, ताई, आजी, आजोबा इत्यादींची नावे सांगतील.<br>2.विद्यार्थी स्वतःचा परिचय / माहिती सांगतील.<br>3.विद्यार्थी आपल्या आवडीचे चित्र रेखाटून त्यांना नावे देतील.<br>4.विद्यार्थी रेखाटलेले चित्र रंगवतील<br>5.विद्यार्थी चित्र रेखाटण्याच्या पायऱ्या सांगतील.<br>6.विद्यार्थी कुटुंबातील व्यक्ती आणि चित्र यांचे साम्य सांगतील. |

## इयत्ता:- पहिली

**माहे : सप्टेंबर २०२१** **विषय : मराठी**

| आठवडा | अध्ययननिष्पत्ती क्रमांक | पाठाचेनाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थीकृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | 01.01.04 | मुंगळा गुळापर्यंत जाईल कसा ?<br>(कृती उपक्रम ) | येथे क्लिक करा | 1.विद्यार्थी लहान लहान कृती करून खेळ खेळतील.<br>2.विद्यार्थी कृती करताना घरातील मोठ्यांची मदत घेतील.<br>3.विद्यार्थी कागदाच्या साह्याने उपक्रम तयार करतील.<br>4.विद्यार्थी मुंगळा आणि गूळ यांबद्दलची माहिती आपल्या शब्दात सांगतील . |
| दुसरा आठवडा | 01.01.07<br>01.01.11 | क म आ ला<br>चित्र बघ. नाव सांग, लिहा व म्हणा. | येथे क्लिक करा | 1.विद्यार्थी घरातील वस्तू ,पदार्थ बघतील. त्यांची नावे सांगण्याचा प्रयत्न करतील.जसे: लसूण, लाडू<br>2.विद्यार्थी चित्रावरील निरीक्षण करून नावे सांगतील.<br>3.विद्यार्थी चित्राच्या नावामधील अक्षरे सांगण्याचा प्रयत्न करतील.<br>4.विद्यार्थी चित्र रेखाटून रंगविण्याचा प्रयत्न करतील.<br>5.विद्यार्थी चित्राचे वर्णन स्वतःच्या शब्दात करतील. |
| तिसरा आठवडा | 01.01.08 | 6.पाऊस | येथे क्लिक करा | 1.विद्यार्थी पावसाची कविता ऐकतील.<br>2.विद्यार्थी पावसाचे वर्णन स्वतःच्या शब्दात करतील.<br>3.विद्यार्थी पावसाचे इतर गाणी म्हणण्याचा सराव करतील.<br>4.विद्यार्थी कवितेतील अक्षरे ओळखण्याचा प्रयत्न करतील.<br>5.विद्यार्थी चित्रातील प्रसंग आपल्या शब्दात सांगतील. |
| चौथा आठवडा | **01.01.02**<br>**01.01.05**<br>**01.01.09** | पाठ ७.झोपाळा गेला उडून<br>**पान क्र 20,21** | येथे क्लिक करा | 1. विद्यार्थी पाठातील चित्रांचे निरीक्षण करतील.<br>2. विद्यार्थी आवडीचे चित्र रेखाटतील, रंग देतील.<br>3. विद्यार्थी आवडलेली गोष्ट स्वतःच्या शब्दात सांगतील.<br>4. विद्यार्थी बेडकाची माहिती स्वतःच्या शब्दात सांगतील.<br>5. विद्यार्थी पाठातील सोपे अक्षरे वाचण्याचा प्रयत्न करतील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चौथा आठवडा | **01.01.09**<br>**01.01.10** | पाठ ८.माझी शाळा<br>**पान क्र** 22 | येथे क्लिक करा | 1. विद्यार्थी पान क्र. 22 वरील चित्रांचे निरीक्षण करतील.<br>2. विद्यार्थी पान क्र.22 वरील चित्रांची माहिती स्वतःच्या शब्दात सांगण्याचा प्रयत्न करतील.<br>3. विद्यार्थी परिसरातील मित्रांची नावे सांगतील.<br>4. विद्यार्थी शाळेचे चित्र रेखाटतील.<br>5. विद्यार्थी घरातील चित्रांची माहिती सांगतील. |
| पाचवा आठवडा | **01.01.09** | पाठ ९.इ,घ,र,ई चित्र बघ .नाव सांगा ,लिहा व म्हणा **पान क्र24,25,26,27** | येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा | 1. विद्यार्थी घरातील वस्तूंचे नाव सांगतील.<br>2. विद्यार्थी माहित असलेल्या अक्षरांचा उच्चार करतील.<br>3. विद्यार्थी इ हे अक्षर गिरवतील.<br>4. विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील शब्दामधून इ, घ, र ,ई हे अक्षरे शोधतील, त्यांच्याभोवती गोल करतील.<br>5. विद्यार्थी ऐकलेल्या शब्दांमधील अक्षरे ओळखण्याचा प्रयत्न करतील. |

## इयत्ता:- पहिली


**माहे : ऑक्टोबर २०२१** **विषय : मराठी**


| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचेनाव | | विद्यार्थीकृती |
|---|---|---|---|---|
| पहिला व दुसरा | **01.01.13** | पाठ ११.माझे शब्द माझे मित्र. लिहूया वाचूया, शब्द शोधुया.<br>**पान क्र** 33 | | 1. विद्यार्थी पान क्र. 33 वरील चित्रांचे निरीक्षण करतील.<br>2. विद्यार्थी पान क्र. 33 वरील चित्रांचे निरीक्षण करून चित्रांची नावे सांगतील.<br>3. विद्यार्थी पेन्सिलच्या मदतीने शब्द गिरवतील.<br>4. विद्यार्थी सोपे शब्द वाचतील.<br>5. विद्यार्थी पान क्र. 35 वरील शब्दकोडेमधून शब्द शोधतील आणि लेखन करतील. |
| दुसरा | **01.01.14** | पाठ – ए, च, ळ, ह, झ **पान क्र 37 , 38** | येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा | 1. विद्यार्थी पान क्र. 37 वरील चित्रांचे निरीक्षण करतील.<br>2. विद्यार्थी चित्रांचे निरीक्षण करून त्यांची नावे सांगतील.<br>3. विद्यार्थी घरातील साहित्याचा उपयोग सांगतील.<br>4. विद्यार्थी **ए, च, ळ, ह, झ** ही अक्षरे गिरवतील.<br>5. विद्यार्थी परिचीत अक्षरांना मात्रा जोडून लेखन करतील. |
| तिसरा | **01.01.13** | लिहूया वाचूया ,शब्द शोधुया<br>**पान क्र. 39** | येथे क्लिक करा | 1. विद्यार्थी पान क्र. 39 वरील मुळाक्षरे वाचतील.<br>2. विद्यार्थी अक्षरांना काना , वेलांटी ,ऊकार ,मात्रा जोडून लेखन करतील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | 3. विद्यार्थी सोपे शब्द तयार करतील .<br>4. विद्यार्थी अक्षरे ओळखण्याचा खेळ खेळतील.<br>5. विद्यार्थी शब्द शोधतील. |
| चौथा | | प्रथम सत्र संकलित मूल्यमापन | | |

# इयत्ता – पहिली

**माहे – ऑगस्ट २०२१** **विषय – गणित** पाठ्यपुस्तक डाऊनलोड

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| 3 | 01.71.02<br>वस्तूंचा आकार आणि लहान मोठेपणा यानुसार वस्तूंचे वर्गीकरण करतात.<br><br>सभोवतालच्या परिसरातील विविध परिस्थिती आणि संदर्भ: लहान-मोठा, आत-बाहेर, पुढे-मागे, ई. संबोध वापरण्यास प्रवृत्त करणे.. | लहान - मोठे | येथे क्लिक करा. | **लहान-मोठा व वर-खाली**<br>• घरातून वेगवेगळया आकाराचे बटाटे, कांदे, पेन, वह्या, पुस्तके इत्यादी जमा करा.<br>• आता दोन ताट घ्या. एका ताटात सगळे आकाराने मोठे बटाटे ठेवा. दुस-या ताटात त्यांच्यापेक्षा आकाराने लहान बटाटे ठेवा.<br>• लहान कांदे परत स्वयंपाकघरात नेऊन ठेवा. मोठे कांदे आईला द्या.<br>• लांबीने मोठी पेन दप्तरात ठेवा व लांबीने लहान पेन तुमच्या बहीण/भावाला द्या.<br>• लांबीने मोठ्या वह्या दाराजवळ नेऊन ठेवा व लहान वह्या खिडकीजवळ ठेवा.<br>• घरातील मोठे ताट टेबलवर ठेवा तर लहान ताट खुर्चीवर ठेवा.<br>• आता लहान बटाटे, लहान कांदे, लहान पेन एका जागेवर एकत्रित ठेवा व सर्व मोठे बटाटे, मोठे कांदे, मोठे पेन दुस-या जागेवर एकत्रित ठेवा.<br>• लहान वस्तूंजवळ तुमच्या लहान बहीण/भावाला बसवा व मोठ्या वस्तूंजवळ तुम्ही बसा.<br>• तुमच्या घरातील सर्वात मोठ्या भांड्यातील प्यायचे पाणी आईला द्या व सर्वात लहान भांड्यातील पाणी तुम्ही प्या.<br>• आता खालील चित्रांमधील मोठ्या आकारांना √ करा.<br> |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | <br>**आता वरीलपैकी लहान रेषेंभोवती रिंगण करा.**<br><br><br><br><br>आपल्या घरातील विविध वस्तूंचा लहान-मोठे ह्या प्रकारे संच करा.<br>उदा- लहान भांडे मोठे भांडे,<br>लहान मोठ्या खेळण्या,<br>बाटल्या,ग्लास,पातेले,चमचे,कुंड्या,<br>झाडे,दगड,इ.यांसारख्या विविध वस्तू वापरून त्यांच्याकडून लहान मोठ्या चा सराव पालकांनी करून घ्यावा. |
| | **01.71.02**<br>**वस्तूंचा आकार आणि लहान मोठेपणा यानुसार वस्तूंचे वर्गीकरण करतात.**<br><br>**सभोवतालच्या परिसरातील विविध परिस्थिती आणि संदर्भ: लहान-मोठा, आत-बाहेर, पुढे-मागे, ई. संबोध वापरण्यास प्रवृत्त करणे..** | ***मागे - पुढे*** | येथे क्लिक करा. | पालकांनी विद्यार्थ्यांकडून सरावासाठी पुढील गोष्टींचा अवलंब करावा..<br><br><br>विद्यार्थी मित्रांनो आपल्या घरात विविध वस्तू आहेत. त्या वस्तूंच्या मागे व पुढे काय काय आहे ते तुम्ही सांगा.<br>**उदा-** घरातील टेबल ( टेबलाच्या मागे असणाऱ्या वस्तू व पुढे असणाऱ्या वस्तूंचे नाव सांग.) , खूर्ची, कपाट ई. यांसारख्या विविध वस्तू वापरून त्यांच्याकडून त्या वस्तूंच्या मागे व पुढे काय आहे ? ते विद्यार्थ्यांना विचारावे व त्याचा सराव करून घ्यावा.<br>**सोबतच पुढे उडी मार मागे उडी मार हा खेळ तुम्हीं मित्रांसोबत खेळा.**<br>सराव **मागे- पुढे**<br>**खालील चित्र पाहा. त्यावरुन प्रश्नांची उत्तरे सांगा.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | एटीएमच्या रांगेत प्रिया दाखवा. ती एटीएम मशीनपासून रांगेत कितव्या जागेवर उभी आहे ? रांगेत प्रियाच्या लगेच समोर मेरी आहे. मेरीच्या लगेच पुढे रवी उभा आहे.<br>प्रियाच्या लगेच मागे महबूब आहे. महबूबच्या लगेच मागे कोण आहे ?<br>फातिमाच्या लगेच पुढे महबूब आहे. फातिमाच्या लगेच मागे कोण आहे ?<br>मेरीच्या लगतच मागे प्रिया आहे. रवीच्या लगतच पुढे काय आहे ?<br>एटीएम मशीनच्या लगेच मागे कोण आहे ? लगेच पुढे कोण आहे ? |
| | | **वर- खाली** | येथे क्लिक करा. | (**वर- खाली**)<br>पुढील कृती ऐका व करून पाहा.<br>दप्तरातील वही घ्या खुर्चीवर ठेवा. एक पुस्तक घ्या खुर्चीखाली ठेवा.<br>वाटी घ्या ओट्यावर ठेवा. पेला घ्या ओट्याखाली ठेवा.<br>आता ओट्याखाली ठेवलेला पेला टेबलावर ठेवा व ओट्यावर ठेवलेली वाटी खुर्चीखाली ठेवा.<br>खुर्चीखाली ठेवलेले पुस्तक टेबलावर ठेवा व खुर्चीवर ठेवलेली वही टेबलाखाली ठेवा.<br>आता एक दोरी व विविध रंगाचे चिमटे घ्या.दोरी उभी धरा.<br>1. दोरीच्या मध्यभागी काळया रंगाचा चिमटा लावा.<br>2. आता काळया चिमटयाखाली पिवळा रंगाचा चिमटा लावा.<br>3. काळ्या रंगाच्या चिमट्यावर लाल रंगाचा चिमटा लावा.<br>4. पिवळ्या रंगाच्या चिमट्यावर हिरव्या रंगाचा चिमटा लावा.<br>आता खालील प्रश्नांची उत्तरे द्या.<br>1. काळ्या रंगाच्या चिमट्याखाली कोणकोणत्या रंगाचे चिमटे आहेत?<br>2. हिरव्या रंगाच्या चिमट्यावर कोणकोणत्या रंगाचे चिमटे आहेत ?<br>आता खालील कृती करा.<br>हात वर करा, खाली करा.<br>दप्तर वर उचला, खाली ठेवा.<br>पुस्तक टेबल वर ठेव,वही टेबल खाली ठेवा.<br>एकावर एक सर्व पुस्तके ठेवा.<br>सर्वात खाली सर्वात मोठे पुस्तक ठेवा व सर्वात वर सर्वात लहान पुस्तक येईल अशी सगळी पुस्तके ठेवा.<br>मणीमाळेवर (माळ उभी धरून)मणी वरसरकवा,खाली सरकवा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आता पुस्तकात दिलेले चित्र पहा.<br>चित्रात झाडाखाली बसलेल्या माकडाला गोल करा.<br>पुलावर असलेल्या वाहनाला गोल करा.<br>दिव्याखालील वस्तूला गोल करा. |

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| ३ | **01.71.02 वस्तूंचा आकार आणि लहान मोठेपणा यानुसार वस्तूंचे वर्गीकरण करतात.**<br><br>**सभोवतालच्या परिसरातील विविध परिस्थिती आणि संदर्भ: लहान-मोठा, आत-बाहेर, आधी - नंतर पुढे-मागे, इ. संबोध वापरण्यास प्रवृत्त करणे..** | **आधी - नंतर** | येथे क्लिक करा. | **आधी – नंतर**<br>• एक पेन, वही, पुस्तक, दप्तर, पेन्सिल, खोडरबर, मोजपट्टी इ. वस्तू घ्या व एका रांगेत खालील सूचनेप्रमाणे ठेवा.<br>• सर्वात आधी दप्तर ठेवा. आता दप्तराच्या मागे वही ठेवा.<br>• आता दप्तरानंतर वही ठेवा.<br>• आता दप्तर व वही यांच्यामध्ये खोडरबर ठेवा.<br>• आता वहीच्या नंतर मोजपट्टी ठेवा.<br>• आता वहीच्या नंतर पेन ठेवा.<br>आता ठेवलेल्या वस्तूंचा क्रम लक्षात घेवून सांगा.<br>१. सर्वात आधी काय ठेवले ? (दप्तर)<br>२. दप्तरानंतर काय ठेवले ? (वही)<br>३. आता सांगा वहीच्या आधी काय ठेवले होते? (दप्तर)<br>४. वहीच्या नंतर काय ठेवले होते? (खोडरबर)<br>५. सर्वात शेवटी काय ठेवले होते? (पेन)<br>६. पेनच्या आधी काय ठेवले होते? (वही)<br>• सकाळी झोपीतून उठल्यावर सर्वात आधी तुम्ही काय करता?त्यानंतर काय करता?<br>ससा कासवाची गोष्ट सांगुन आधी कोण पोहचले?नंतर कोण?<br>**आधी व नंतर काय होते ते सांगा.**<br>कळी येणे , फूल होणे<br>भाकरी थापणे , भाकरी भाजणे<br>सूर्य उगवणे , सूर्य मावळणे<br>ब्रश करणे , अंघोळ करणे |

## चाचणी – गणित – इयत्ता १ ली (आठवडा ३)


### घटक – लहान मोठा ,वर-खाली, आधी- नंतर - गुण – १०


**प्र. १ ला -** लहान चित्राखाली √ कर. **२ गुण**





**प्र. २ रा -** मोठ्या चित्राखाली √ कर. **२ गुण**






**प्र. ३ रा -** खालील सूचना वाचून टिक करा. **२ गुण**

१. खुर्चीवर असलेल्या चित्राखाली √ कर.




२. शिडीखाली असलेल्या चित्राला √ कर.




**प्र. ४ था -** आधी काय होईल? या चित्राखाली √ कर. **२ गुण**







| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ☐ ☐ ☐ ☐ | | |
| प्र. ५ वा – | | **सांगितल्याप्रमाणे चित्र काढ.**<br>**१. लहान आणि मोठा चेंडू** ☐ ☐<br>**२. कळी आणि फूल** ☐ ☐ | | **२ गुण** |
| ४ | **01.71.02**<br>**वस्तूंचा आकार आणि लहान मोठेपणा यानुसार वस्तूंचे वर्गीकरण करतात.**<br><br>**सभोवतालच्या परिसरातील विविध परिस्थिती आणि संदर्भ: लहान-मोठा, आत-बाहेर, पुढे-मागे, ई. संबोध वापरण्यास प्रवृत्त करणे..** | **एक – अनेक** | येथे क्लिक करा. | **आठवडा क्रमांक ३ व ४**<br>**<u>एक-अनेक</u>**<br>• वेगवेगळया वस्तू (उपलब्ध)मध्यभागी ठेवा. त्यांची नावे सांगा.<br><br>• आता हातात पेन घ्या व म्हणा ही एक पेन आहे.<br>• आता एकापेक्षा जास्त वस्तू हातात घ्या.आता म्हणा एकपेक्षा जास्त पेन. अनेक पेन.<br>• याप्रकारे एक वही घ्या. म्हणा एक वही. आता अजून काही वह्या घ्या. म्हणा अनेक पेन.<br>• याप्रकारे वेगवेगळ्या वस्तू घ्या व सुरुवातील एक घेवून म्हणा.. एक वस्तू नंतर एकपेक्षा जास्त **घेवून म्हणा अनेक वस्तू**<br>विद्यार्थी मित्रांनो पुस्तकातील चित्रे बघा.<br>एका ब्रशभोवती गोल कर.<br>अनेक वस्तूंभोवती गोल कर.<br>एका फुलाभोवती गोल कर.<br>अनेक भोवऱ्याभोवती गोल कर. |
| | | **फरक ओळखा** | | विद्यार्थी मित्रांनो पुढील दोन चित्रांचे बारीक निरीक्षण कर. त्यातील फरक ओळखून सांग. |
| ४ | **01.71.03** | **१ ची ओळख व लेखन** | येथे क्लिक करा. | हाताचे एक बोट दाखव. --एक बोट.<br>• तुला नाक किती? |


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **वस्तूंच्या, चित्रांच्या किंवा चिन्हांच्या साहाय्याने २० पर्यंतच्या संख्यांची नावे म्हणतात आणि मोजतात.** | | | • तोंड किती?<br>• एक उडी मार.<br>• एक टाळी वाजव.<br>• खालील चांदणीचे चित्र  पाहा.<br>• जेवढे चित्र तेवढ्या टाळ्या वाजव. टाळी वाजव व म्हण एक चांदणी<br>• १ वही दाखव व मोठ्याने म्हण १ वही.<br>• १ पंखा व दाखव व म्हण १ पंखा.आता पाटीवर लिही १ व म्हण एक<br>• आता पाटीवर मोठ्या अक्षरांत १ काढ व म्हण एक.<br>आता ,<br>एक ढग काढ आणि रंगव.<br>एक चांदणी काढ आणि रंगव.<br>पुस्तकातील १ अंकावर गिरव. |
| | 01.71.03 **वस्तूंच्या, चित्रांच्या किंवा चिन्हांच्या साहाय्याने २० पर्यंतच्या संख्यांची नावे म्हणतात आणि मोजतात.** | **२ ची ओळख व लेखन** | [येथे क्लिक करा.] | • हाताचे दोन बोटे दाखव . म्हण दोन तुला डोळे किती ? (दोन)<br>दोन उड्या मार.दोन टाळ्या वाजव.<br>खालील चांदणीचे चित्र पाहा. जेवढे चित्र तेवढ्या टाळ्या वाजव.<br>टाळी वाजव व म्हण दोन चांदण्या<br>दोन चित्रे काढा.दोन गोल काढा.२ अंक गिरव.<br> |


| | |
|---|---|
| **चाचणी – गणित – इयत्ता १ ली**<br>**घटक – एक- अनेक, १ ची ओळख, २ ची ओळख - गुण – १०** | |
| **प्र.१ ला -** | **एक चेंडू असलेल्या चित्रासमोर √ कर. (२ गुण)**<br> ☐  ☐ |
| **प्र.२ रा -** | **२ फुगे असलेल्या चित्रासमोर √ कर. (२ गुण)**<br> |

| | |
|---|---|
| |  |
| प्र. ३ रा – | चित्रात किती चिमण्या आहेत. मोज व लिही. (२ गुण)<br>  |
| प्र. ४ था – | चित्रे पाहा. मोज व संख्या लिही. (४ गुण)<br>    |
| | |

**माहे– सप्टेंबर २०२१** **– विषय – गणित**



| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| १ | **1 ते 9 अंकाचा वापर करुन वस्तू मोजतो.** | **३ ची ओळख व लेखन** | येथे क्लिक करा. | **३ ची ओळख व लेखन**<br>• **ऐक व करून दाखव.**<br>• हाताची ३ बोटे दाखव.<br>• म्हण तीन बोटे.<br>• तीन उड्या मार.<br>३ वह्या दाखव व मोठ्याने म्हण ३ वह्या.<br>३ पेन दाखव व म्हण ३ पेन.<br>आता पाटीवर लिही ३ व म्हण तीन<br>आता पाटीवर मोठ्या अक्षरांत ३ काढ व म्हण .. तीन<br>• तीन टाळ्या वाजव.<br>• तीन चित्रे काढ.<br>• तीन गोल काढ.<br>३ अंक गिरव. |





| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | **1 ते 9 अंकाचा वापर करुन वस्तू मोजतो.** | **४ ची ओळख व लेखन** | [येथे क्लिक करा.]() | **४ ची ओळख व लेखन**<br>• ऐका व करुन दाखवा.<br>हाताची ४ बोटे दाखव.<br>म्हण चार बोटे.<br>४ उड्या मार.<br>चार टाळ्या वाजवा.<br>चार चित्रे काढा.<br>चार गोल काढ.<br>४ अंक गिरव. |
| | **1 ते 9 अंकाचा वापर करुन वस्तू मोजतो.** | **५ ची ओळख व लेखन** | [येथे क्लिक करा.]() | **५ ची ओळख व लेखन**<br>• ऐक व करुन दाखव.<br>हाताची ५ बोटे दाखव म्हण पाच बोटे.<br>पाच उड्या मार.पाच टाळ्या वाजव.<br>पाच चित्रे काढ. पाच गोल काढ.<br>कागदाचे समान खालीलप्रमाणे तुकडे करा. खालील संख्या पाहा. जेवढी संख्या तेवढे तुकडे घ्या व संख्या मोठ्याने वाचा.<br><br><br>अंक गिरव. |

| **चाचणी – गणित – इयत्ता १ ली<br>घटक – ३, ४ आणि ५ ची ओळख व लेखन – गुण – १०** | |
|---|---|
| **प्र. १ ला –** | **३ संख्या दाखवणा-या चित्रांसमोर √ कर.**<br> |
| **प्र. २ रा –** | **४ संख्या दाखवणा-या चित्रांसमोर √ कर.**<br> |
| **प्र. ३ रा –** | **५ संख्या दाखवणा-या चित्रांसमोर √ कर.** |







| | |
|---|---|
| प्र. ४ था – | **संख्या पाहा व तेवढ्या उभ्या रेषा समोर काढ. (२ गुण)**<br><br>३ ⠀⠀⠀⠀⠀ ५ ⠀⠀⠀⠀⠀ ४ |
| प्र. ५ वा – | **चित्रे पाहा. मोज व संख्या लिही.**<br><br>   |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | **1 ते 9 अंकाचा वापर करुन वस्तू मोजतो** | **६ ची ओळख व लेखन** | येथे क्लिक करा. | **६ ची ओळख व लेखन**<br>• ऐका व करुन दाखव.<br>• हाताची सहा बोटे दाखव.<br>• सहा उड्या मार.<br>• सहा टाळ्या वाजव.<br>• खालील चांदणीचे चित्र पाहा. जेवढे चित्र तेवढ्या टाळ्या वाजव. सहा टाळ्या वाजव व म्हण सहा चांदण्या.<br><br>• आता पाटीवर लिही ६ व म्हण सहा<br>• आता पाटीवर मोठ्या अक्षरांत ६ काढ व म्हण सहा. |
| | **1 ते 9 अंकाचा वापर करुन वस्तू मोजतो** | **७ ची ओळख व लेखन** | येथे क्लिक करा. | ७ ची ओळख व लेखन<br>• ऐका व करुन दाखव.<br>• हाताची सात बोटे दाखव.<br>• सात उड्या मार.<br>• सात टाळ्या वाजव. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | • खालील चांदणीचे चित्र पाहा. जेवढे चित्र तेवढ्या टाळ्या वाजव. सात टाळ्या वाजव व म्हण सात चांदण्या.<br><br>• आता पाटीवर लिही ७ व म्हण सात<br>• आता पाटीवर मोठ्या अक्षरांत ७ काढ व म्हण सात.७ |
| | **1 ते 9 अंकाचा वापर करुन वस्तू मोजतो** | **८ ची ओळख व लेखन** | [येथे क्लिक करा.]() | • ऐका व करून दाखवा.<br>• हाताची आठ बोटे दाखव.<br>• आठ उड्या मारा.<br>• आठ टाळ्या वाजव.<br>• खालील चांदणीचे चित्र पाहा. जेवढे चित्र तेवढ्या टाळ्या वाजव व म्हण आठ चांदण्या<br><br>• आता पाटीवर लिही ८ व म्हण आठ<br>• आता पाटीवर मोठ्या अक्षरांत ८ काढ व म्हण आठ.८ |
| | **1 ते 9 अंकाचा वापर करुन वस्तू मोजतो** | **९ ची ओळख व लेखन** | [येथे क्लिक करा.]() | • हाताची नऊ बोटे दाखव.<br>• नऊ उड्या मारा.<br>• नऊ टाळ्या वाजव.<br>• खालील चांदणीचे चित्र पाहा. जेवढे चित्र तेवढ्या टाळ्या वाजव व म्हण नऊ चांदण्या.<br><br>• आता पाटीवर लिही ९ व म्हण आठ<br>• आता पाटीवर मोठ्या अक्षरांत ९ काढ व म्हण नऊ.९ |
| ४ | **शून्य ही संकल्पना समजून घेतो.** | **० ची ओळख व लेखन** | [येथे क्लिक करा.]()<br><br>[येथे क्लिक करा]() | ० ची ओळख व लेखन<br>एक पाटी घे. त्यावर ५ पेन घेवून खालील चित्राप्रमाणे ठेव. म्हण ५ सुटे.<br><br>एक सुटा उचलून लप व सांग पाटीवर आता किती सुटे दिसतात ? (४) |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | <br>एक सुटा उचलून लपव की पाटीवर आता किती सुटे दिसतात ? (३)<br><br>एक सुटा लपव व सांग की पाटीवर आता किती सुटे दिसतात ? (२)<br><br>एक सुटा उचलून लपव व सांग की पाटीवर आता किती सुटे दिसतात ? (१)<br><br>एक सुटा उचलून लपव व सांग की पाटीवर आता किती सुटे दिसतात ?<br>काहीच नाही<br><br>**काहीच नाही म्हणजे शून्य.** |
| | | | | • काहीच नाही म्हणजे शून्य. शून्य आपण 0 असा लिहितो.<br>• आता मणीमाळेवर ५ मणी घे. त्यातील एकावेळी एक मणी एका टोकाकडे सरकव व सांग की प्रत्येकवेळी किती मणी राहिले ?<br>• असे सर्व मणी एका टोकाकडे जाईपर्यंत कर.<br>• ५ मणी सरकवून झाल्यानंतर किती मणी राहिले याचे उत्तर काहीच नाही म्हणजे ०<br>• आता लिही 0<br>• मामाने दिले ५ बिस्किट. राजूने सर्व ५ बिस्कीट खाल्ले.राजूकडे उरले बिस्कीट<br>• काहीच नाही -० |


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | • चिंकूला बाबांनी ३ वह्या विकत घेवून दिल्या. तीनही वह्या लिहून भरल्या. आता लिहायचिंकूकडे राहिल्या वह्या –० <br> बाबूकडे होती ४ डझन केळी. ती सर्व त्याने विकली. आता बाबूकडे किती डझन केळी राहिली ? – ० डझन |


| चाचणी – गणित – इयत्ता १ ली <br> घटक – ७ ते ९ व ० ची ओळख व लेखन – गुण – १० | |
|---|---|
| **प्र.१ ला –** | **चित्र पाहा व तेवढ्या चौकटी रंगव. (२ गुण)** <br>  |
| **प्र.२ रा –** | **८ वर्तुळांसमोर √ कर. (२ गुण)** <br>   |
| **प्र. ३ रा –** | **संख्या पाहा व जोडी लाव. (२ गुण)** <br> ९ <br> ८ <br> ७ <br>  |
| **प्र.४ था –** | **चित्रांमध्ये ० ही संख्या दिसते त्यासमोर √ लिही. (२ गुण)** <br>   |
| **प्र.५ वा –** | **दिलेली संख्या पूर्ण करण्यासाठी लागणारी वर्तुळे काढ. (२ गुण)** <br> ७  <br> ८  |

| | |
|---|---|
| | ९ |

| | | (सन २०२१ -२२ ) | | ( ऑक्टोबर २०२१ ) |
|---|---|---|---|---|
| आठवडा | अध्ययन निष्पत्ती | घटकाचे नाव | अध्ययन - अध्यापन स्त्रोत | आठवडानिहाय प्रस्तावित अध्ययन कृती (शिक्षकांच्या मदतीने पालकांनी करावयाचे मार्गदर्शन) वार्षिक नियोजनानुसार एका आठवडयात पूर्ण करावयाचा आशय |
| १ | ०१.७१.०२. | कमी – जास्त | येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा | **आठवडा क्रमांक १**<br>**कमी-जास्त**<br>• ६ पेन, ४ वाट्या, २ पुस्तके , ३ वह्या, ८ कांदे, ९ मणी घ्या<br>• आता एका रांगेत सर्व पेन मांडा.<br>• पेनच्या खाली ४ वाट्या रांगेत मांडा.<br>• वाट्यांच्याखाली २ पुस्तके, त्याच्याखाली ३ वह्या, त्याच्याखाली ८ कांदे, त्याच्याखाली ९ मणी एका रांगेत मांडा.<br>• आता प्रत्येक पेनसोबत वाट्यांच्या जोड्या बनवा.<br>• किती जोड्या बनल्या?<br>• जोड्या तयार केल्यानंतर कोणत्या वस्तू उरल्या? किती? (पेन उरल्या- २)<br>• असे का झाले? (वाट्यांपेक्षा पेन जास्त होत्या.)<br>• जोड्या बरोबर करण्यासाठी काय करशील? (२ वाट्या आणखी घ्याव्या लागतील.)<br>• अजून काय करता येईल? (२ पेन कमी करून घेतल्या की वाट्यांसोबत बरोबर जोड्या बनतील.)<br>• येथे लक्षात घ्या की,<br>1. पेन जास्त आहेत वाट्यांपेक्षा<br>2. वाट्या कमी आहेत पेनपेक्षा |
| | | | | • आता याप्रमाणेच उरलेल्या प्रत्येक वस्तूच्या जोड्या इतर वस्तूंशी लावा.<br><br>• कोण जास्त? कोण कमी? हे सांगा.<br><br>• बरोबर संख्या होण्यासाठी काय करता येईल हे सांगा? |




| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | <br> |
| | | **चढता<br>–<br>उतरता<br>क्रम** | **चढता–<br>उतरता<br>क्रम**<br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा | **चढता– उतरता क्रम**<br>• **कागदाचे/पुठ्ठ्याचे एकसारखे भरपूर तुकडे घ्या.**<br>• **आता त्यातील ३ तुकडे पहिल्यांदा घ्या.**<br>• **३ तुकड्यांनंतर २ तुकडे घ्या.**<br>• **आता ८ तुकडे घ्या.**<br>• **सर्वात कमी कोणते तुकडे आहेत ते एक रांगेत मांडा.**<br>• **आता खाली थोडी जागा सोडून सर्वात जास्त कोणते तुकडे आहेत ते एका रांगेत मांडा.**<br>• **आता उरलेले तुकडे मध्ये सोडलेल्या जागेत मांडा.**<br>• **तुम्ही असे केले आहे का?तुमची मांडणी पाहा व सांगा.**<br><br>• **असे मांडले असेल तर तुम्ही लहानाकडून मोठ्याकडे असे मांडले आहे हे लक्षात घ्या. याला चढता क्रम म्हणू.**<br>• **आपण खालून वर पाय-या चढत जाणे हे चढता क्रम आहे.**<br>• **तुम्ही चढत्या क्रमाने मांडलेल्या संख्या लिहा.**<br>**२, ३, ८**<br>• **आता वरील तुकडे नव्या पद्धतीने मांडू.**<br>• **अगोदर सर्वात जास्त तुकडे लावा. (८)**<br>• **त्याखाली थोडी जागा सोडा.**<br>• **आता त्याखाली सर्वात कमी असलेले तुकडे लावा.(२)** |





| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | • मध्यभागी जागा सोडलेल्या ठिकाणी उरलेले तुकडे लावा. (३)<br>• आता तुमची मांडणी खालीलप्रमाणे दिसते का पाहा.<br>• असे केले असेल तर तुम्ही मोठ्याकडून लहानाकडे अशी मांडणी केलेली आहे. याला आपण उतरता क्रम म्हणू.<br><br>• तुम्ही उतरत्या क्रमाने मांडलेल्या संख्या लिहा.<br>८, ३, २<br>• आता खालील संख्यांच्या रिकाम्या जागी योग्य संख्या लिहा.<br>• ४ ___ ६<br>• हा कोणता क्रम आहे? (चढता क्रम)<br>• ९___ ७<br>• हा कोणता क्रम आहे? (उतरता क्रम)<br>• **आता रिकाम्या जागी अशा संख्या मांडा की उतरता क्रम होईल.**<br>८,_,_,_,_,_,_,_<br>• पुस्तकातील उदाहरणे सोडवा |
| चाचणी – इयत्ता १ ली –गणित –<br>घटक – कमी – जास्त, चढता – उतरता क्रम<br>गुण – १० | | | | |
| प्र.१ ला – | खालील चित्रे पाहा व त्यातील जास्त असणा-या चित्राला √ कर. (२ गुण) | | | |



| | |
|---|---|
| |  |
| प्र. २ रा – | खालील रेघा मोज व त्यापेक्षा कमी रेघा त्यापुढे दिलेल्या जागेत काढ. (१ गुण)<br> –<br>पुढील त्रिकोण मोज व त्यापेक्षा २ जास्त त्रिकोण काढ. (१ गुण)<br> – |
